सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ उत्पादनाच्या वेष्टनावर विशिष्ट आरोग्य चेतावणी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
गो. ते. रुग्णालय, संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ०१.
**शासन निर्णय क्र.तनिका-२०१५/प्र.क्र.१७७/आरोग्य ५**
दिनांक: ०३ मे, २०२१

**वाचा:-** १.केंद्र शासनाचे " सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे निषेध) अधिनियम, २००३" (कोटपा कायदा-२००३)
२. भारत सरकारचे राजपत्र क्र. CG-DL-E-२१०७२०२०-२२०६०९ दिनांक २१ जुलै, २०२०
३. केंद्र शासनाचे पत्र क्र. D.O.No.P-१६०११/०२/२०१७-TC(Part१) दिनांक ३ डिसेंबर, २०२०

सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे निषेध) अधिनियम, २००३ (कोटपा कायदा-२००३) अधिनियमित करण्यात आले आहे, जेणेकरुन तंबाखुच्या वापरापासून परावृत्त करणे आवश्यक आहे. कोटपा-२००३ हा कायदा सर्व तंबाखुजन्य उत्पादनासाठी लागू आहे आणि तो संपूर्ण देशास लागू आहे . कायद्याच्या कलम -७ मध्ये सर्व तंबाखुजन्य उत्पादनाच्या वेष्टनावर विशिष्ट आरोग्य चेतावणी देण्याची तरतूद आहे . राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी सन २०१६-१७ पासून राज्यातील सर्व जिल्हयात करण्यात येत आहे. तंबाखू तथा तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या दुषपरिणामाबाबत राज्यभर विविध माध्यमाव्दारे जनजागृती करण्यात येत आहे.

२. दि.१५ मार्च, २००८ रोजीच्या जिएसआर १८२ (ई) नुसार सिगारेट व इतर तंबाखुजन्य उत्पादने (पॅकेजिंग व लेबलिंग) नियमांना अधिसूचित केले आणि सर्व तंबाखुजन्य पदार्थाच्या वेष्टनावर (पॅकवर) विशिष्ट आरोग्य चेतावणी प्रदर्शित करण्यासाठी नियमांमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ उत्पादनाच्या वेष्टनावर (पाकीट) दोन्ही बाजूस ८५% आरोग्य चेतावणीचा इशारा प्रदर्षित करणे अनिवार्य केले आहे . ३ एप्रिल २०१८ रोजीच्या जिएसआर ३३१ (ई) च्या आधार एप्रिल २०१८ मध्ये नियमांमध्ये सुधारण करण्यात आली आहे.



Scanned with CamScanner


३. यापूर्वी सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (पॅकेजिंग व लेबलिंग) नियम ५ नुसार तंबाखुजन्य पदार्थाच्या पॅकेजवरील आरोग्यविषयक चेतावणी दर चोवीस महिन्यात बदलली जात होती. आता, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (पॅकेजिंग व लेबलिंग) तिसरी दुरुस्ती करण्यात आली आहे.

४. तंबाखु व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवानामुळे आरोग्यावर होणा -या दुष्परिणामांबद्दल विशेषत: तरुण मुले आणि अशिक्षित लोकांमध्ये विशिष्ट आरोग्य चेतावणीचा इशाराबाबत जागरुकता आणणे आवश्यक आहे.

५. केंद्र सरकारने सदंर्भिय दिनांक २१ जुलै, २०२० रोजीच्या राजपत्र अधिसूचनेच्या जिएसआर ४५८ (ई) नुसार नवीन निर्दिष्ट आरोग्य चेतावणी अधिसूचित केली आहे. जेणेकरुन तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या पाकिटावरील/वेष्टनावरील मुख्य प्रदर्शन क्षेत्राच्या किमान ८५ % क्षेत्रावरील तंबाखु उत्पादनाच्या पॅकेजवर अनिवार्य प्रदर्शन केले जावे. हे नियम १ डिसेंबर, २०२० पासून लागू होतील.

६. धूम्रपान आणि तंबाखुजन्य पदार्थ उत्पादनाच्या पॅकेजवर ह्या दोन्ही प्रकारांसाठी एक सामान्य नमूद केलेली आरोग्याची सूचना पुढीलप्रमाणे असेल.

. **चित्र-1**




I) सदर प्रतिमा ही १ डिसेंबर, २०२० पासून बारा महिन्यांच्या कालावधीसाठी वैध असेल. तंबाखुमुळे पिडादायक मृत्यू येतो हा शब्द लाल प्रार्श्वभूमीवर (बॅकग्राउंड) पांढ-या रंगामध्ये दिसून येईल आणि "आजच सोडा , कॉल करा १८००-११-२३५६" हा शब्द पांढ-या रंगात काळ्या पार्श्वभूमीवर (बॅकग्राउंड) दिसून येईल.

II) हे निर्देश १ डिसेंबर २०२० पासून लागू होतील, " तंबाखूमुळे पिडादायक मृत्यू येतो" हा शब्द लाल पार्श्वभूमीवर (बॅकग्राउंड )पांढ-या रंगामध्ये दिसून येईल आणि " आजच सोडा, कॉल करा १८००-११-२३५६ हा शब्द पांढ-या रंगात काळ्या पार्श्वभूमीवर (बॅकग्राउंड) दिसून येईल.



Scanned with CamScanner

III) सचित्र आरोग्य चेतावणी आणि मजकूर आरोग्य चेतावणी चार रंगासह मुद्रित केली जाईल, ज्याचे प्रिंटिंग रेझोल्युशन किमान ३०० डीपिआय (डोट्स प्रती इंच )असेल. त्यांचे Font चे अक्षर प्रकार आणि रंग विहित केल्याप्रमाणेच असतील.

IV) १ डिसेंबर २०२० रोजी किंवा नंतर तयार केलेल्या किंवा पॅकेज केलेल्या किंवा आयात केलेल्या सर्व तंबाखु उत्पादनावर प्रतिमा १ आणि १ डिसेंबर २०२१ रोजी किंवा नंतर तयार किंवा आयात केलेल्या किंवा पॅकेज केलेल्या सर्व उत्पादनावर प्रतिमा २ प्रदर्शित करण्यात येईल.

**चित्र-2**




७. उपरोक्त नमूद केलेल्या तरतुदीचे उल्लंघन करणे हा सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (जाहिरात निषेध व व्यापार व वाणिज्य नियमन, उत्पादन, पुरवठा व वितरण) अधिनियम २००३ च्या कलम २० मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारावास किंवा दंडनीय गुन्हा आहे. तसेच वैधानिक चेतावणी इशारा बाबतच्या नियमांची संपूर्ण राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०४२२१५१६४४०११७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Archana

(अर्चना वालझाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.



Scanned with CamScanner

४) मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
८) विभागीय आयुक्त (सर्व).
९) जिल्हाधिकारी (सर्व).
१०) महानगरपालिका आयुक्त (सर्व).
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई.
१२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई व पुणे.
१३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१४) निवड नस्ती (आरोग्य-५)



Scanned with CamScanner